संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# काळ म्हणजे जगण्याचे बळ

इंग्रजी कालगणनेप्रमाणे आजपासून नवीन वर्ष सुरु होत आहे. ३१ डिसेंबरला २०१८ या वर्षाला निरोप दिला गेला आणि मोठ्या उत्साहात जल्लोषामध्ये अनेकांनी २०१९ चे स्वागतही केले. कदाचित जल्लोषाला निमित्त हवे असते म्हणून ३१ डिसेंबर ही तारीख अनेकांना दिलासा देणारी वाटते, आणि अगदी स्पष्ट सांगायचे तर हे वर्ष बदलण्याचा हा प्रकार म्हणजे केवळ कॅलेंडर बदलण्यापलिकडचा कोणताही मोठा प्रकार ठरत नाही कारण तुमच्या आमच्या किंवा सामान्य माणसाच्या जीवनात जुने वर्ष जाऊन नवे वर्ष आले तरी फार काही क्रांतिकारी बदल होत नाही. मनुष्य हा अनेक गोष्टींसाठी निमित्त शोधतो किंवा अनेक गोष्टींसाठी काळ हेच निमित्त होत असते. काळाचा महिमाच तसा आहे तिथे कोणाचेही काही चालत नाही, आणि म्हणून माणसाला काळाबरोबर चालण्याशिवाय पर्याय राहात नाही, आणि मग अशाच निमित्ताने नव्या वर्षाच्या स्वागताप्रित्यर्थ पार्ट्या करून शुभेच्छा देण्याचे प्रकार होतात. या पार्ट्यांच्या स्वरुपाबद्दल आज इतकी विचित्र परिस्थिती आहे की शिकल्या सवरलेल्या माणसांनाही आपल्या आयुष्यातल्या सरणाऱ्या काळाविषयी गंभीरता तर वाटत नाहीच. पण जो काही आनंद वाटतो त्यालादेखील नको त्या गोष्टींचे ग्रहण लावून तो स्वतःच अनेक चांगल्या गोष्टींवर विरजण पाडत असतो.ही गोष्ट निश्चितच महत्वाची असते की, मनातल्या सदभावना किंवा संवेदनांना साक्षीला ठेवून सरणाऱ्या वर्षाविषयीची मतं व्यक्त होतात, आणि निदान नव्याने सुरु होणारं वर्ष अधिक समृध्दीचं असावं, नव्या संकल्पनांना बळ देणारे असावे. काही उद्दिष्ट, ध्येय साध्य व्हावीत मनातल्या अपेक्षा आकांक्षांना काही प्रमाणात का होईना परंतु मूर्त स्वरुप यावं म्हणजेच आपल्या प्रयत्नातून आपल्या अस्तित्वातून स्वतःबरोबर परिवार, कुटुंब किंवा सामाजिक कर्तव्यांचे पालन करता यावे सरणारा काळ हा याच अर्थाने जबाबदारीचेही भान देणारा वाटत असतो. त्याच जबाबदारीचा लेखाजोखा अशा वर्षाच्या निरोपाच्या किंवा नववर्षाच्या स्वागतासाठी घ्यावा असे अनेकांना वाटू शकते.

### मनुष्याच्या मर्यादा

एक मात्र खरे मनुष्य किंवा समाजाला या सृष्टीतली कोणतीही गोष्ट आपल्या आवाक्यात ठेवता येऊ शकत नाही, आणि मग तो या काळालादेखील कॅलेंडरच्या पानावर किंवा पंचांगांच्या घटिका-पळावर मर्यादित ठेवून त्यांचे मोजमाप घेण्याचा किंवा ते ठरवण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असतो. अर्थात ते करण्याशिवाय त्याला पर्यायही नसतो. आपल्या व्यवहारांमध्ये सोयीसाठी त्याला अशा कालगणनेचा आधार घ्यावा लागतो. ज्याप्रमाणे ही सगळी सृष्टी एक निराकार आणि निर्गुण स्वरुपाची आहे. त्याचप्रमाणे काळ नावाचा हा प्रकारही निराकार आणि निर्गुण ठरतो. ज्याला आपण बिनचेहऱ्याचा किंवा फेसलेस म्हणू शकतो. यातला गंमतीचा आणि तितकाच गंभीर भाग असा की काळ हा बिनचेहऱ्याचा असूनही तो प्रत्येकाला त्याचे प्रतिबिंब दाखवण्याचे अदभूत काम करतो. काळ हा आरशासारखा मानला जातो. आणि त्यामध्ये डोकावून मनुष्याला आपल्या गुणअवगुणांचे आकलन करावे लागते. काळाचा हा आरसा समोर ठेवूनच व्यक्ती किंवा समाजाचे अनेक व्यवहार होतात. याकरीताच घड्याळ आणि कॅलेंडर रोज पाहाण्याशिवाय गत्यंतर उरत नसते. काळाचा हा जगड्व्याळ व्याप पाहून माणसाला त्याची शक्तीही लक्षात येते. बुध्दीची झेप तो जाणतो. आणि मग काळाशी स्पर्धा न करता केवळ त्याच्याबरोबर जाता येईल का यासाठी वेळ नावाची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करून घेतो. शक्य तितक्या वेळापत्रकाप्रमाणे वागण्याची त्याची धडपड चालू राहाते. परंतु रोजचा सूर्योदय आणि सूर्यास्त प्रत्येकासाठी महत्वाचा ठरला पाहिजे. कारण या दोन घटनांमधला काळ प्रत्येकाला रोज काही ना काही शिकवून जाणारा असतो. हेच अनुभव मनुष्याला जगण्यासाठी प्रेरणाही देत राहातात. एका संस्कृत सुभाषितात असे म्हटले आहे की

दिवसे नैव ततकुर्यात येन रात्रौ सुखं वसेत्।
पूर्वे वयसि ततकुर्यात येन वृध्दः सुखं भवेत्

याचा अर्थ दिवसा असे कार्य करावे की रात्री सुखाने झोप लागेल आणि आयुष्याच्या पूर्वार्धात असेच कार्य करावे की वृध्दत्व किंवा म्हातारपण सुखी होईल. यामधला मतितार्थ काळाचीच महती सांगतो. शिवाय जगण्याचा आणि काळाचा किती घनिष्ट संबंध आहे हेही नकळतपणे सांगून जातो.

### आपणच काळाचे कारण

सध्या तर ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. मनुष्याच्या मदतीला रोबोट येऊ घातला आहे. अंतराळातले अनेक ग्रहतारे पादाक्रांत करण्याची भाषा बोलली जात आहे. हे विज्ञान तंत्रज्ञान काळालाही मागे टाकणारे आहे. इथपर्यंत त्या दर्पोक्तीचा अहंकारही व्यक्त होतो. परंतु सुखासाठीची धडपड ही स्वतःपुरतीच मर्यादित राहाते. काळावर त्याचा कोणताही परिणाम होत नसतो. फक्त आपण त्या काळाचे निमित्त ठरत असतो. राजा कालस्य कारणम् म्हणजे जसा राजा असेल तसा काळ त्या राज्यात येतो. त्याप्रमाणे प्रजेला वागावे लागते. तशीच आजची परिस्थिती आहे. मनुष्य किंवा समाज हाच काळाचे कारण आहे. तो जसा वागेल व्यवहार करेल बुध्दीचे , विचारांचे, संस्कारांचे जसे संवर्धन करेल तीच काळाची ओळख ठरेल. अर्थातच या मूलभूत विचाराकडे दुर्लक्ष होते, आणि काळाबरोबर स्पर्धा करीत आपण जिंकत असल्याचा, विजयी होत असल्याचा भास निर्माण केला जातो. यापेक्षा आपल्यासह सर्वांच्या सुखाचा विचार करून आपल्या जगण्याला आणि काळालाही नवा संदर्भ देता आला पाहिजे. तसे जर झाले नाही. तर कालाय तस्मै नमः म्हणून गप्प राहाण्याची वेळ येते. अशा काही गोष्टींच्या अनुषंगाने सरणारे वर्ष आणि येणाऱ्या काळाचा विचार केला पाहिजे. निदान त्यासाठी तरी एकमेकांना शुभेच्छा आणि सदिच्छा दिल्या पाहिजेत.